महाराष्ट्रशासन

# उसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक

संदर्भ सेवा रुग्णालय आवार, शालीमार चौक नाशिक

| | |
|---|---|
| कार्यालय दूरध्वनी क्र. :- ०२५३-२५९२२७१ | जाक्र./उपसंआसे/अंतिम निर्लेखन विक्री /6450/1/२०२४<br>दिनांक :- २८/११/२०२४ |

## -: दरपत्रक सुचना :-

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक येथिल निर्लेखित केलेली उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय.टी.उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग यांची विक्री करिता ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांकडून सिलबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

दरपत्रक कार्यवाही वेळापत्रक

| SR.NO. | Activity | Date/Period |
|---|---|---|
| 1 | Sale Of Quotation(Free Of Cost) | 29/11/2024 |
| 2 | Date Of Submitting Quotation | 29/11/2024 |
| 3 | Last Date Of Submitting Quotation | 05/12/2024 |
| 4 | Quotation Opening | 06/12/2024 |

उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक येथिल विक्री करावयाच्या निर्लेखित केलेली उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय.टी.उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग यांचा तपशिल ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठाणांनी आपले प्रतिष्ठाणाचे दरपत्रके पात्रतेसाठी खलिलप्रमाणे प्रमाण्पत्र/कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

१) Shop Act रजिस्ट्रेशन ची प्रत(गुमास्ता नोंदणी पत्र)

२) Pan Card ची प्रत (पॅन कार्ड)

३) GST Registration Certificate (जि.एस.टी नोंदणी पत्र )

४) Quotation On Firms Letterhead (प्रतिष्ठाणाचे लेटर हेडवर दरपत्रक)

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांना दरपत्रकातील कोणत्याही बाबीची संख्या कमी जास्त करण्याचे आणी कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचे/वेळापत्रकात बदल करण्याचे/संपूर्ण प्रक्रीया रदद करण्याचे सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

(डॉ.कपिल आहेर)
उपसंचालक, आरोग्य सेवा
नाशिक मंडळ, नाशिक.

महाराष्ट्रशासन

**उसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक**

संदर्भ सेवा रुग्णालय आवार, शालीमार चौक नाशिक

| | |
|---|---|
| कार्यालय दूरध्वनी क्र. :- ०२५३-२५९२२७१ | जाक्र./उपसंआसे/अंतिम **निर्लेखन विक्री** / _ /२०२४<br>दिनांक :-२८/११/२०२४ |

**महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग**
**उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक**

उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक, यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांतील अंतिमरित्या निर्लेखित उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय.टी.उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. इच्छुक ठेकेदारांनी विक्री फॉर्म नमुना प्राप्त करणेसाठी या कार्यालयाशी दि.२९/११/२०२४ ते ०५/१२/.२०२४ या कालावधी मध्ये सकाळी ११ ते ३ या वेळेत संपर्क साधावा.

विक्री फॉर्म कोटेशनसह जमा करण्याचा अंतिम दि. : ०५/१२/२०२४

दुरध्वनी क्र. :- ०२५३-२५९२२७१
ई-मेल :-ddhsnashik@gmail.com

**(डॉ.कपिल आहेर)**
**उपसंचालक, आरोग्य सेवा**
**नाशिक मंडळ, नाशिक.**

## -: अटी व शर्ती :-

१) दरपत्रक उपसंचालक ,आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक, यांचे कार्यालयात दिनांक २९/११/२०२४ ते ०५/१२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत सादर करावेत.

२) सदरील दरपत्रक मोहरबंद लिफाफयामध्ये सादर करण्यात यावेत. सदरील लिफाफयावर निर्लेखित उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय टी. उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग खरेदीकरीता दरपत्रके असे ठळकपणे नमूद करण्याम यावे.

३) विहीत मुदतीत प्राप्त झालेलीच दरपत्रके स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) सदरील नमूद दरामध्ये खाडाखोड अथवा अंक गिरवले नारवे अन्यथा सदर दरपत्रक बाद करण्यात येईल.

५) सदरील दरपत्रक उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांचे कार्यालयात दिनांक ०५/१२/२०२४ रोजी उघडण्यात येईल.

६) खरेदीधारकास शासकीय कामाचा अनूभव असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल.

७) सदर सर्व लॉटची खरीदाराकडून लावण्यात येणा-या किंमतीची एकूण येणारी रक्कम ज्या खरीदाराची जास्त असेल त्याप्रमाणे अनुक्रम लावले जातील.

८) सदर निर्लेखित उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय टी. उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग ७ दिवसाच्या आत उचल करणे बंधनकारक राहील व उचल करण्याची जबाबदारी खरेदीधारकाची राहील. याकरिता कुठलाही वाहतूक भत्ता, कूरीयर, किंवा इतर भाडे या कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) दरपत्रकरंना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये त्रुटी आढळल्यास ही दरपत्रके स्विकारणे, नाकारणे, अथवा रदद करणे, इत्यादी अधिकार उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांना राहतील.

**(डॉ.कपिल आहेर)**
**उपसंचालक, आरोग्य सेवा**
**नाशिक मंडळ, नाशिक.**

## निर्लेखन लॉटची यादी

## आरोग्य संस्थेचे नाव – उपसंचालक कार्यालय नाशिक मंडळ, नाशिक

| अ. क्रं. | विभागाचे नाव | लॉटचे नाव व क्रमांक | एकूण संख्या | हातची एकूण किंमत (रुपये) | |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ,नाशिक | लॉटचे क्रमांक १ उपकरणे | ०३ | ८३३६ /- | |
| २ | | लॉटचे क्रमांक २ जडवस्तु साहित्य | २४६ | ५९९०९ /- | |
| ३ | | लॉटचे क्रमांक ३ आय.टी. उपकरणे | ११८ | १२२०० /- | |
| ४ | राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ,नाशिक | लॉटचे क्रमांक १ उपकरणे | ०१ | ५२३८ /- | |
| ५ | | लॉटचे क्रमांक २ जडवस्तु साहित्य | ४३ | १४६७० /- | |
| ६ | | लॉटचे क्रमांक ३ आय.टी. उपकरणे | १८ | ४००० /- | |
| ७ | विभागिय लस भांडार नाशिक मंडळ नाशिक | लॉटचे क्रमांक १ उपकरणे | ०९ | १३८०० /- | |
| ८ | | लॉटचे क्रमांक २ जडवस्तु साहित्य | १९ | ५३२० /- | |
| ९ | विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा नाशिक | लॉटचे क्रमांक १ (२०१७) जडवस्तु साहित्य | १२६ | ११२४७ /- | |
| १० | | लॉटचे क्रमांक १ हत्यारे | १७ | ५९१२ /- | |
| ११ | | लॉटचे क्रमांक २ सुटटेभाग | २०१ | ९४३३ /- | |
| १२ | | लॉटचे क्रमांक ३ आय.टी. उपकरणे | ०१ | २०० /- | |
| १३ | | लॉटचे क्रमांक ४ जडवस्तु साहित्य | १२ | ५२० /- | |

(डॉ.कपिल आहेर)
उपसंचालक, आरोग्य सेवा
नाशिक मंडळ, नाशिक.

महाराष्ट्रशासन

**उसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक**

संदर्भ सेवा रुग्णालय आवार, शालीमार चौक नाशिक

६४२४०/३

| | |
|---|---|
| कार्यालय दूरध्वनी क्र. ०२५३-२५९२२७१ | जाक्र./उपसंआसे/अंतिम निर्लेखन विक्री /__ /२०२४<br>दिनांक :- २७/११/२०२४ |

विर्की फॉम नमूना

विषय :-उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांतील अंतिम निर्लेखित उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय.टी.उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग यांचे विक्री करणे बाबत...

संदर्भ :- या कार्यालयाची उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय.टी.उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग यांची विक्री दरपत्रक सुचना तवहलंण्ड्ीर्तीजतंण्हवअण्पद या वेबसाईटवर प्रकाशित दि.

कार्यालयातील निर्लेखित उपकरणे, जडवस्तू संग्रह, आय.टी.उपकरणे, हत्यारे व सुटटे भाग यांची विक्री पुढील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

१) विक्री करावयाच्या वस्तू व वस्तूंची यादी आपणास उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक येथे दि २९/११/२०२४ ते ०५/१२/२०२४ पर्यंत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

२) वस्तू जशा स्थितीत आहेत त्या स्थितीत विकणे आहे.

३) विक्री फॉर्मची फी (रु.५००/- अक्षरी पाचशे रु फक्त ना परतावा) रोख भरुन ठेकेदारास उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक येथून निवीदा फॉर्म प्राप्त करावा लागेल आणि त्या अधिकृत फॉर्मवरच निर्लेखित वस्तू विक्री बाबतचा लखोटा असे नमुद करुन सिलबंद लखोटा जाहीरातील नमुद अंतिम तारखे पुर्वी दि.०५/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावा लागेल.

४) वेळे नंतर अथवा उशिरा आलेले लखोटे स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) अधिकृत फॉर्मची फी (रु.५००/- अक्षरी पाचशे रु फक्त नॉन रिफंडेबल आहे.) कोणत्याही सबबीमध्ये निवीदा फॉर्मची रक्कम परत केली जाणार नाही.

६) अधिकृत फॉर्म सादर न केल्यास आपले दरपत्रक रदद करण्यात येईल.

७) संपुर्ण लॉटची किंमत आपणास नमूद करावी लागेल. सदर किंमतीवर आपणास १८ टक्के दराने जी.एस.टी. भरावा लागेल.

८) फॉर्म सोबत पॅन कार्ड,जि.एस.टी नोंदणी पत्र, बॅंक डिटेल, शॉप ॲक्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. सदर कागदपत्रे आपल्या अर्जासोबत जोडली नसतील तर आपला अर्ज रदद करणेत येईल याची नोंद घ्यावी.

९) आपले दरपत्रक मान्य झाल्यास आणि कार्यालयाचे आदेश आपणास प्राप्त झालेस त्याच दिवशी एकूण २५ टक्के एवढी रक्कम आपणास जमा करावी लागेल. उर्वरीत ७५ टक्के रक्कम आणि जी.एस.टी. १८ टक्के असे एकूण रक्कम धनाकर्षाच्या(डिमांड ड्राफट) च्या स्वरुपात या कार्यालयामध्ये पुढील ५ दिवसामध्ये जमा करावी लागेल. अन्यथा आपला कोणताही अधिकार या लॉटवर राहणार नाही.

१०) कार्यालयीन उपकरणे व जडवस्तू संग्रह व आय टी. उपकरणे आपणास आहे त्या जागेवरुन कार्यालयास बाब विचारात घेवून स्वखर्चाने घेउन जावी लागतील.

११) सदरची निवीदा / फॉर्म स्विकारणे,नाकारणे अथवा रदद करणे या बाबतचे सर्व अधिकार कार्यालय प्रमुख या नात्याने उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांनी राखून ठेवलेले आहेत. ते आपणास बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

**(डॉ.कपिल आहेर)**
**उपसंचालक, आरोग्य सेवा**
**नाशिक मंडळ, नाशिक.**

वरील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला मान्य आहेत. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

सर्व लॉटची एकूण रक्कम रु .................(अक्षरी रु ............................)

(ठेकेदाराचे नाव , सही , शिक्का आणि मोबाईल नं., ई-मेल)
दिनांक. ..................